
# प्रमाण

- **संक्षिप्तमध्ये शब्दांची ओळख**
- प्रमाता – ज्ञान घेणारा व्यक्ति म्हणजे प्रमाता.
- प्रमाण – योग्य ज्ञान मिळण्यासाठी वापरलेले साधन म्हणजे प्रमाण.
- प्रमेय – ज्या बद्दल ज्ञान मिळवायचे आहे ती वस्तु किंवा विषय म्हणजे प्रमेय.
- प्रमिती – प्रमाणाद्वारे मिळालेले योग्य व सत्य ज्ञान म्हणजे प्रमिती.
- प्रमा – योग्य व यथार्थ ज्ञान म्हणजे प्रमा.
- अप्रमा – चुकीचे किंवा अयोग्य ज्ञान म्हणजे अप्रमा.




- **प्रमाण पर्याय** - उपलब्धि, साधन, ज्ञान, परीक्षा, करण, माध्यमं

## प्रस्तावना

- **परिभाषा प्रकरण -**

| | Ref | **परिभाषा** |
|---|---|---|
| प्रमाण | न्याय | **प्रमीयते अनेन इति प्रमाणम् |** (ज्याद्वारे यथार्थ ज्ञान मिळते) |
| | न्या. वा | अर्थोपलब्धिः हेतुः प्रमाणम्ः । - न्याय वार्तिक |
| | वात्सायन | प्रमाता येनार्थं प्रमिणोति तत्प्रमाणम् । |
| | तर्कदीपिका | प्रमाताः करणं प्रमाणम् । |
| | उदयनाचार्य | यथार्थ अनुभवः प्रमा, तत् साधनं च प्रमाणम् । |
| | तर्कभाषा | प्रमाकरणं प्रमाणम्, यथार्थानुभवः प्रमा, साधकतमं करणम् । |
| | इतर | उपलब्धि साधनानि प्रमाणानि ।<br>**सम्यक ज्ञानं प्रमाणम् ।** - न्यायदीपिका |
| परीक्षा | चक्रपाणी | परीक्ष्यते व्यवस्थाप्यते वस्तुस्वरूपमनयेति परीक्षा । |
| | गंगाधर | परीक्ष्यते यया बुद्ध्या सा परीक्षा । |
| | वात्स्यायन | **प्रमाणैरर्थावधारणं परीक्षा ।** |
| प्रमा | उदयनाचार्य | **यदर्थविज्ञानं सा प्रमा** |
| | तत्त्वचिंतामणि | यत्र यदस्ति तत्र तस्यानुभवः प्रमा । |
| | तर्कसंग्रह | तद्वति तत्प्रकारकानुभवो यथार्थः । |
| प्रमेय | वात्स्यायन | **यो अर्थः प्रमीयते तत्प्रमेयम्** |
| | गंगाधर राय | प्रमाणेन प्रमीयते यत् तत् प्रमेयम् । |
| प्रमाता | चरक | आत्मा ज्ञः करणैर्योगान् ज्ञानं त्वस्य प्रवर्तते । |

- प्राप्त झालेले ज्ञान यथार्थ आहे की नाही हे पाहण्यासाठी 2 वाद सांगितले आहेत.
    - स्वतः प्रमाण्यवाद, परतः प्रमाण्यवाद

- **बुद्धि / ज्ञान विवेचन**
- **पर्याय** - बुद्धि, उपलब्धि, ज्ञान, महत् बुद्धित्व
- **बुद्धि परिभाषा**
    - तर्कसंग्रह - सर्व व्यवहार हेतुरगुणो बुद्धिर्ज्ञानम् । (सर्व व्यवहाराचे ज्ञान ज्या कारणाने होते ते बुद्धि)
    - चक्रपाणि - बुद्धिस्तूहापोहज्ञानम् । (उहापोह करुन ज्ञान मिळवणे या बुद्धि म्हणतात)
    - सांख्य - विषय युक्त मनाचे परिणाम विशेषला ज्ञान म्हणतात
    - माध्वाचार्य – मनाचे परिणाम म्हणजेच ज्ञान असते.
- **ज्ञान कसे होते ?** –
    - आयुर्वेद, न्याय, वैशेषिक - आत्मामनइन्द्रियविषय यांच्या सन्निकर्षाने ज्ञान होते. ज्ञान हे निराकार व अनित्य असते.
    - वेदान्त दर्शन - मन हे विषय प्रदेशामध्ये जावून तदाकार होते.

- **बुद्धि प्रकार** –
- प्रशस्तपाद अनुसार - 2
    1) विद्या (यथार्थ ज्ञान) 2) अविद्या (अयथार्थ ज्ञान)
- तर्कसंग्रह - 2 – स्मृति, अनुभव

**1) स्मृति**

- दृष्टश्रुतानुभूतानां स्मरणात् स्मृतिरुच्यते । - च.शा. 1
- अनुभवजन्य ज्ञान स्मृतिः । - तर्कसंग्रह
- **संस्कारमात्रजन्यं ज्ञानं स्मृतिः** । - तर्कसंग्रह
- दृष्टं प्रत्यक्षोपलक्षणम्, श्रुतं त्वागमप्रतितम्, तेन सर्वपूर्वानुभूतावरोधः । - चक्रपाणि
- स्मरणन्त्वात्मनो ज्ञस्वाभाव्यात् । - न्याय दर्शन
- आत्ममनसोः संयोगविशेषात् संस्काराच्च स्मृतिः । - वैशेषिक
    - तर्कसंग्रह अनुसार स्मृति प्रकार - 2
        A) प्रमाजन्य यथार्थ
        B) अप्रमाजन्यः अयथार्थ

- चरक अनुसार स्मृति प्रकार - 8

  A) निमित्तकारण  B) सत्वानुबंध  C) रूपग्रहण  D) अभ्यास
  E) सादृश्य  F) ज्ञानयोग  G) सविपर्यय  H) पुनः श्रुत

- न्यायदर्शन अनुसार स्मृतिचे 24 कारण

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रणिधान | परिग्रहं | विरोध | भय | निबन्ध | आश्रयाश्रित |
| अतिशय | अभ्यास | सम्बन्ध | प्राप्ति | क्रिया | लिंग |
| आनन्तर्य | व्यवधान | राग | लक्षण | वियोग | सुख-दुःख |
| सादृश्य | एककार्य | इच्छा-द्वेष | अधर्म | धर्म | अर्थित्व |

**2) अनुभव**

- अनुभवो नाम स्मृतिष्यतिरिक्तं ज्ञानम् | - तर्कभाषा
- तद्भिन्नं ज्ञानम् अनुभवः | - तर्कसंग्रह
- अनुभव प्रकार - 2

A) यथार्थ अनुभव (प्रमा)

- यथार्थं अनुभवः प्रमा | - उदयनाचार्य
- यद् अर्थविज्ञानं सा प्रमा | - वात्स्यायन
- यत्र यदस्ति तत्र तस्यानुभव: प्रमा | - तत्वचिंतामणि
- वस्तु जाशी आहे तसेच त्याचे ज्ञान होणे म्हणजे यथार्थ अनुभव असते.
- उदा. –अश्वला पाहून अश्वाचेच ज्ञान होणे.
- यथार्थ अनुभव प्रकार - 4 - प्रत्यक्ष, अनुमिति, उपमिति, शब्द

B) अयथार्थ अनुभव (अप्रमा)

- अयथार्थानुभवोऽप्रमा | - तर्कसंग्रह
- तदभाववति तत्प्रकारकोऽनुभवोऽयथार्थः |
- वस्तु जशी आहे त्याचे तसेच ज्ञान न होता काही अन्य ज्ञान होणे.
- उदा. – अश्वाला पाहून श्वान आहे असे समजणे
- अयथार्थ अनुभव प्रकार - 3

**I. संशय**

- अथ संशयः संशयो नाम सन्देहलक्षणा तु सन्दिग्धेष्वर्थष्वनिश्चयः | - च.वि8
- **जिज्ञासाजनकं ज्ञानं संशयः** | - तर्कभाषा
- एकस्मिन धर्मणि विरुद्धनानाधर्म वैशिष्ट्यावगाहिज्ञानं संशयः | यथा स्थाणुर्वा पुरुषोवेति | -त.सं
- उदा. - शुष्क वृक्षला पाहून व्यक्तिचा आभास होणे.
- **संशय प्रकार 3** - (तर्कभाषा)

  अ) समानधर्म दर्शनजन्य,  आ) विप्रतिपत्तिजन्य,  इ) असाधारणधर्मजन्य

**II. विपर्यय –**

- **मिथ्याज्ञानं विपर्ययः** | यथा शुक्ति इद् रजतं इति | (तर्कसंग्रह)
- विपर्ययौ मिथ्याज्ञानम् तद्दरूपप्रतिष्ठम् | - योगसूत्र
- अतस्मिस्तदिति प्रत्ययो विपर्ययः | - प्रशस्तपाद
- मिथ्या ज्ञानाला विपर्यय म्हणतात.
- उदा. – चमकणाऱ्या शुक्तिला पाहून त्याला रजत मानणे.

**III. तर्क -**

- व्याप्यारोपेण व्यापकरोपस्तर्कः | यथा यदि वन्हिर्नस्यात् तर्हि धूमोऽपि न स्याद् इति || - त.सं
- अविज्ञात तत्वेर्थे कारणोपपत्तितस्तत्वज्ञानार्थमूहस्तर्कः | - न्यायसूत्र
- एखाद्या अज्ञात वस्तुला यथार्थ रूपाने समजण्यासाठी कारण आणि उत्पत्तिपूर्व विचारविमर्श करणे याला तर्क म्हणतात.
- सर्वदर्शनसंग्रह ग्रंथमधील अक्षपाद दर्शनमध्ये 11 तर्कविशेष सांगितले

➢ तर्क प्रकार - 5

अ) व्याघात – केलेल्या विधानानेच ते विधान असत्य होणे

उदा – मि मुका आहे, हे बोलून सांगणे.

आ) आत्माश्रय - लक्षण सांगताना त्या लक्षणाचाच आधार घेणे

उदा. ब्राह्मणचा पुत्र ब्राह्मण. यात ब्राह्मणचा विशिष्ट अर्थ ज्ञात होत नाही.


इ) अन्योन्याश्रय - वाक्यश्रवण जागृत्तिचे कारण आणि जागृति वाक्यश्रवणचे कारण |

उदा. कणाद ऊठ असे म्हणल्यावर कणाद उठतो.

ई) चक्रक / चक्रकापत्ती - परंपराने अन्योन्याश्रय अर्थात् चक्रक

उ) अनवस्था - कल्पनास्थैर्य नसणे.

- FlowChart




*प्रमाण संख्या*

| **प्रमाण संख्या** | **सन्दर्भ** | **प्रमाण नाव** |
|---|---|---|
| 1 | चार्वाक | प्रत्यक्ष |
| 2 | वैशेषिक, बौद्ध, जैन | प्रत्यक्ष, अनुमान |
| | माधव सम्प्रदाय | प्रत्यक्ष, शब्द |
| 3 | सांख्य, योग, रामानुज | प्रत्यक्ष, अनुमान, शब्द |
| | चरक (रोग ज्ञानार्थ) | आप्तोपदेश, प्रत्यक्ष, अनुमान (क्रम imp) |
| 4 | चरक (पुनर्भव सिद्धिसाठी) | आप्तोपदेश, प्रत्यक्ष, अनुमान, युक्ति |
| | सुश्रुत | आगम (शब्द), प्रत्यक्ष, अनुमान, उपमान |
| | न्याय दर्शन | प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द |
| 5 | प्रभाकर, पूर्वमीमांसा | प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति |
| 6 | कुमारिल भट्ट, वेदान्त | प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति, अनुपलब्धि |
| 8 | पौराणिक | प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति, अनुपलब्धि, संभव, ऐतिह्य |
| 9 | तांत्रिक | प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति, अनुपलब्धि, संभव, ऐतिह्य, चेष्टा |
| 11 | काव्यशास्त्र | प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति, अनुपलब्धि, संभव, ऐतिह्य, चेष्टा, परिशेष, प्रतिभा |

- **अष्टविध प्रमाणांचा त्रिविध प्रमाणांमध्ये समावेश** –
- आप्तोपदेशमध्ये - ऐतिह्यचा समावेश
- प्रत्यक्षमध्ये - अनुपलब्धि (अभाव), चेष्टा
- अनुमानमध्ये - उपमान, अर्थापत्ति, संभव, विशेष, प्रतिभा

## प्रत्यक्ष प्रमाण

- **निरुक्ति** –
- अक्षमक्षम्प्रतीत्योत्पद्यते इति प्रत्यक्षम् | - प्रशस्तपाद
- अक्षाणीन्द्रियाणी प्राणरसचक्षुस्त्वक् श्रोत्रमनांसि | - प्रशस्तपाद

- **प्रत्यक्ष प्रमाण परिभाषा**
- इन्द्रियार्थं सन्निकर्षोत्पन्नं ज्ञानम् अव्यपदेश्यं अव्यभिचारि व्यवसायात्मकं प्रत्यक्षम् | - न्यायदर्शन
- तत्र प्रत्यक्षज्ञानकरणम् प्रत्यक्षम् | इन्द्रियार्थ सन्निकर्षजन्यं ज्ञान प्रत्यक्षम् || - तर्कसंग्रह
- प्रतिविषय अध्यवसायो दृष्टम् प्रत्यक्षम् | - सांख्य
- प्रत्यक्षं तु खलु तद्यत् स्वयमिन्द्रियैर्मनसा चोपलभ्यते | - च.वि. 4
- प्रत्यक्षमिति यत्किंचिद् एव अर्थस्ये साक्षात्कारिकं ज्ञानं तद् एव प्रत्यक्षम् |
- साक्षात्कार प्रमाकरणम् प्रत्यक्षम् | - तर्कभाषा

- **प्रत्यक्ष प्रमाण लक्षण**
- आत्मेन्द्रियमनोऽर्थानां सन्निकर्षात् प्रवर्तते | व्यक्ता तदात्वे या बुद्धिः प्रत्यक्षं सा निरुच्यते || - च.सू. 11
- यतोभवति इन्द्रियादेः ईदृशी बुद्धिः तत् प्रत्यक्षम् | - च.सू. 11
- चक्षुबुद्ध्यादी आत्मा मनसा संयुज्यते, मन इन्द्रियेण, इन्दिय अर्थेन | - वात्स्यायन / च.सू. 8 / चक्रदत्त टीका
- प्रत्यक्षं नाम तद्यदात्मनां च इन्द्रियैश्च स्वयमुपलभ्यते, तत्रात्मप्रत्यक्षा: सुखदुःखेच्छाद्वेषादयः, शब्दादयस्त्विन्द्रिय प्रत्यक्षा|-च.वि.8
- इन्द्रियेणोन्द्रियार्थो हि समनस्केन गृह्यते | - च.शा

- **प्रत्यक्ष प्रमाणचे भेद** – 2 –
- तर्कसंग्रह - निर्विकल्पक, सविकल्पक प्रत्यक्ष
- तर्कभाषा - अविकल्प व सविकल्प

1) **निर्विकल्पक प्रत्यक्ष**
- तत्र निष्प्रकारकं ज्ञानं निर्विकल्पकम् | यथा किंचित् इदं इति | - तर्कसंग्रह
- ज्या ज्ञानामध्ये कोणतेही विकल्प (विशेषण इत्यादी) नसतात आणि फक्त एखाद्या वस्तूचे सामान्य ज्ञान होते, त्याला निर्विकल्पक ज्ञान म्हणतात. यामध्ये "ही काहीतरी वस्तू आहे" एवढेच ज्ञान होते.
- निर्विकल्पक हे सविकल्पक ज्ञानाचे पहिले पायरी (प्रारंभिक टप्पा) आहे.
- निर्विकल्पक ज्ञान हे अतिन्द्रिय ज्ञान मानले जाते.

2) **सविकल्पक प्रत्यक्ष**
- सप्रकारकं ज्ञानं सविकल्पकम् | यथा - डित्थोऽयं ब्राह्मणोऽयं श्यामोऽयमिति | - तर्कसंग्रह
- अनुभवात येणाऱ्या प्रत्येक सविकल्पक ज्ञानामध्ये विशेषण, विशेष्य आणि त्यांचा संबंध (संसर्ग) यांचा समावेश असतो. ज्या ज्ञानामध्ये वस्तूचे नाव, जाति, गुण, विशेष्य-विशेषण इत्यादींचे स्पष्ट ज्ञान होते, त्याला सविकल्पक प्रत्यक्ष म्हणतात.
- उदा. "हा डित्थ (लाकडी हत्ती) आहे", "हा ब्राह्मण आहे", "हा श्याम आहे" इत्यादी.
- सविकल्पक ज्ञानाचे प्रकार - 2 – लौकिक, अलौकिक

   A) **लौकिक प्रत्यक्ष**
   - इन्द्रियांचा साक्षात् विषयांशी संबंध येवून ज्ञान होते.
   - लौकिक ज्ञानाचे 2 प्रकार – बाह्य व अभ्यंतर

      अ) **बाह्य लौकिक प्रत्यक्ष**
      - यालाच इन्द्रिय प्रत्यक्ष असे ही म्हणतात –
      - चक्षुरादि पाच ज्ञानेन्द्रियांद्वारे रूपादि विषयांचा होणारे ज्ञान म्हणजेच बाह्यप्रत्यक्ष होय.
      - इन्द्रिय भेदाने बाह्य प्रत्यक्ष ज्ञानाचे 5 प्रकार

        श्रोत्रज प्रत्यक्ष    त्वक् प्रत्यक्ष    चाक्षुष प्रत्यक्ष
        रासन प्रत्यक्ष    घ्राणज प्रत्यक्ष

**आ) अभ्यंतर लौकिक प्रत्यक्ष**

- यालाच मानस प्रत्यक्ष असे ही म्हणतात
- मनाद्वारे सुख-दुःख, इच्छा-द्वेष इत्यादिचे ज्ञान होणे म्हणजेच अभ्यंतर लौकिक प्रत्यक्ष होय

- इन्द्रिय भेदाने लौकिक प्रत्यक्षचे एकुण प्रकार – 5 + 1 = 6

**B) अलौकिक प्रत्यक्ष**

- इन्द्रियांचे त्यांच्या विषयांसोबत साक्षात् संबंध न होता जे ज्ञान होते तसेच ज्या ज्ञानाचे प्रत्यक्ष व्यतिरिक्त अन्य कोणतेही प्रमाण नसते त्याला अलौकिक प्रत्यक्ष म्हणतात.
- **अलैकिक ज्ञानाचे 3 प्रकार**

**अ) सामान्य लक्षण प्रत्यासत्ति**

- यामध्ये वस्तुच्या सामान्य जातीचे (वस्तुसोबत प्रत्यक्ष सन्निकर्ष न होता) ज्ञान होते.
- पूर्वी एकदा घट पहिल्यानंतर पुन्हा प्रत्यक्ष घटाला न पाहता सुद्धा घटाचे प्रत्यक्ष ज्ञान होते.

**आ) ज्ञानलक्षण प्रत्यासत्ति**

- यात वस्तुच्या विशिष्ट जातीचे ज्ञान होते.
- उदा. बर्फला स्पर्श न करतासुद्धा त्याच्यामध्ये शीतलता आहे हे विशिष्ट गुणाचे ज्ञान होते.
- चंदनचा विचार केल्यावर घ्राणेन्द्रियसोबत संबंध न होता सुद्धा त्याच्या सुगंध या विशिष्ट गुणाचे ज्ञान होते.


**इ) योगज प्रत्यासत्ति**

- योगी पुरुषांना योगाभ्यास करुन त्याद्वारे प्रत्यक्ष ज्ञान होत
- हे ज्ञान असाधारण प्रत्यक्ष आहे.
- योगज प्रत्यक्ष ज्ञानाचे 2 प्रकार

  I) युक्त - योगी पुरुषांना समस्त पदार्थांचे सदैव ज्ञान होते, ते युक्त आहे.

  II) युञ्जान् – चिंतापरक ज्ञान - ध्यानाद्वारे पदार्थांचे ज्ञान होते. योगीला ध्यान पश्चात् समाधी द्वारा कोणताही वस्तुचे विशेष ज्ञान होते.

- Flowchart



## इन्द्रियार्थ सन्निकर्ष

- इन्द्रियांचा त्यांच्या अर्थासोबत होणारा संयोग म्हणजे इन्द्रियार्थ सन्निकर्ष
- **सन्निकर्ष**
- सन्निकर्षो नाम संबंध:
- संबंध प्रकार - 2 - 1) नित्य - (समवाय) 2) अनित्य - (सन्निकर्ष / संयोग)

- **इन्द्रियार्थ सन्निकर्षचे 6 प्रकार – कारिकावली**

1) संयोग सन्निकर्ष
2) संयुक्त समवाय सन्निकर्ष
3) संयुक्त समवेत समवाय सन्निकर्ष
4) समवाय
5) समवेत समवाय
6) विशेषण विशेष्याभावः

### 1) संयोग सन्निकर्ष
- इंद्रियांना त्यांच्या विषयांचे ज्ञान होणे हेच संयोग सन्निकर्ष आहे.
- इंद्रियांचा द्रव्यांसोबत संयोग झाल्याने द्रव्याचे प्रत्यक्ष ज्ञान होते
- उदा. – घटाचे चक्षुरेन्द्रियद्वारा प्रत्यक्ष संयोग झाल्याने घटाचे प्रत्यक्ष ज्ञान होते.


### 2) संयुक्त समवाय सन्निकर्ष
- इन्द्रियांद्वारे द्रव्याच्या गुणादिचे प्रत्यक्ष ज्ञान होणे, यालाच संयुक्त समवाय सन्निकर्ष म्हणले आहे.
- उदा. - घटाच्या रूपाचे (कृष्ण वर्णी, गोलाकार) ज्ञान होणे.

### 3) संयुक्त समवेत समवाय सन्निकर्ष
- इन्द्रियांद्वारा द्रव्य, गुण व जाती या तीन पदार्थांचा प्रत्यक्ष ज्ञान होणे, यालाच संयुक्त समवेत समवाय सन्निकर्ष म्हणतात.

### 4) समवाय सन्निकर्ष
- अयुतसिद्ध (अतूट) संबंधाला समवाय म्हणतात.
- शब्द हे आकाशाचे गुण आहे. शब्द व आकाश यांमध्ये समवाय संबंध असतो. श्रोत्रेन्द्रियद्वारे शब्दाचे जेंव्हा प्रत्यक्ष ज्ञान होते तेंव्हा कर्णमध्ये शब्दचा समवाय सन्निकर्ष होतो.

### 5) समवेत समवाय सन्निकर्ष
- शब्दाची शब्दत्व ही जाती श्रोताला समवेत समवाय सन्निकर्षाने समजते

### 6) विशेषण विशेष्याभाव सन्निकर्ष
- अभावाचे प्रत्यक्ष ज्ञान ज्याद्वारा होते त्याला विशेषण विशेष्याभाव सन्निकर्ष म्हणतात.
- उदा. भूमिवर घट नाही, असे घटाचे अभावचे ज्ञान होणे. यात घटाचा अभाव हे विशेषण आणि भूमी विशेष्य आहे.



- **आयुर्वेदनुसार इन्द्रिय सन्निकर्षचे स्वरूप –**

- आयुर्वेदमध्ये इन्द्रियार्थ संयोग हे मुख्यतः 2 प्रकारचे आहे.

1) सात्म्य इन्द्रियार्थ संयोग - सम्यक् ज्ञानाची प्राप्ती करणारा. हितकर व स्वास्थ्यरक्षक
उदा. घट, घटाचे रूप व रूपत्व याचे प्रत्यक्ष ज्ञान होणे.

2) असात्म्य इन्द्रियार्थ संयोग – इन्द्रियांचे त्यांच्या विषयांसोबत विषम संयोग होणे.
असात्म्य इन्द्रियार्थ संयोगचे प्रकार - 3 - मिथ्यायोग, अतियोग, अयोग

- **प्रत्यक्ष ज्ञान बाधक भाव किंवा हेतु - 8 (चरक व सांख्य)**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **चरक** | अतिसन्निकर्षात | अतिविप्रकृष्टात | आवरणात् | करणदौर्बल्यात् | मनःअनवस्थानात् | समानाभिहारात् | अभिभवात् | अतिसौक्ष्यात् |
| **सांख्य** | सामीप्यात् | अतिदूरात् | व्यवधानात् | इन्द्रियघातात् | मनोऽनवस्थानात् | समानाभिहारात् | अभिभवात् | सौक्ष्म्यात् |

## *इन्द्रिय विवेचन*

- **इन्द्रिय निरुक्ति**

- इन इति विषयाणां नाम तान् इनः विषयान् प्रतिद्रवन्तीति इन्द्रियम् | - माठर
(इन म्हणजे विषय / अर्थ. जे विषयांच्या प्रति द्रवित होतात ते इन्द्रिय)
- यद्वा इन्द्रियस्य आत्मनः लिंग चिन्हम् उपभोगसाधनम् इन्द्रियम् इति |
- इन्द्रः प्राणस्तस्य लिंगम् इन्द्रियम् | - चक्रपाणि

- **इन्द्रिय परिभाषा / व्याख्या -** शरीरसंयुक्त ज्ञान करणम् अतिन्द्रियं इन्द्रियम् | -तर्कभाषा
- **इन्द्रिय लक्षण**

- इन्द्रस्य प्रत्यागात्मनो लिंगम् अनुमानात्मकं, तेन दृष्टं मम चक्षुर्मम श्रोत्रमित्येवमभिमतम् |
- इन्द्रियम् इन्द्रलिंगम् इन्द्रदृष्टम् इन्द्रसृष्टम् इन्द्रजुष्टम् इन्द्रदत्तम् इति वा | - पाणिनी सूत्र
- पाणिनीने इन्द्रिय लक्षण पाच अर्थयुक्त सांगितले.
    1) इन्द्रिगम - इन्द्र (प्राण) चे लिंग आहे.
    2) इन्द्रदृष्टम् - इन्द्रद्वारा पाहिले जाते.
    3) इन्द्रसृष्टम् - इन्द्रद्वारा सृजन केले जाते.
    4) इनद्रजुष्टम - इन्द्र युक्त असते.
    5) इन्द्रदत्तम् - इन्द्रद्वारा दिले जाते.

- **इन्द्रियांची उत्पत्ति**

- चरकनुसार - जायते बुद्धिरव्यक्ताद् बुद्ध्याऽहमिति मन्यते | पर खादीन्यहंकारात् उत्पद्यते यथाक्रमम् ||
ततः सम्पूर्ण सर्वांगो जातोऽभ्युदित उच्यते | एकैकाधियुक्तानि खादीनाम् इन्द्रियाणि तु | - च.शा. 1
- सुश्रुतनुसार - भौतिकानि च इन्द्रियाणि आयुर्वेद वर्ण्यन्ते तथेन्द्रियार्था | - सुशा. 1 (11 इन्द्रिये – पांचभौतिक)
- सांख्यनुसार - सात्विक एकादशकः प्रवर्तते वैकारिकाद् अहंकारात् |
सात्विक अहंकार हे राजस अहंकारच्या सहाय्याने 11 इन्द्रियांची उत्पत्ती करते.
- वैशेषिकनुसार - त्या – त्या महाभूतांचे परमाणुद्वारा (श्रोत्रेन्द्रिय व्यतिरिक्त)

- **इन्द्रिय प्रकार व संख्या**

- सांख्य, वैशेषिक, सुश्रुत – इंद्रियांचे 3 प्रकार
    - ज्ञानेन्द्रिय – 5 कर्मेन्द्रिय – 5 ज्ञानकर्मेन्द्रिय / उभयात्मक / आभ्यंतर इन्द्रिय - 1 - मन

- **इन्द्रियांची विशेषता**

- इन्द्रिय हे प्रमेय आहेत.
- इन्द्रिय स्वयं इन्द्रियगम्य नाहीत.
- इन्द्रिय हे ज्ञानाचे कारण आहे.
- इन्द्रिय सूक्ष्म असल्याने अतिन्द्रिय असतात.

## अनुमान प्रमाण

- **विविध शब्दांची ओळख**
- अनुमान प्रमाण - ज्या ज्ञानाद्वारे आपण प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टीवरून न दिसणाऱ्या गोष्टीचा तर्क लावतो, त्याला 'अनुमान' म्हणतात. उदा. धूर पाहून अग्नीचा तर्क करणे.
- अनुमिती - अनुमान प्रक्रियेतून जे अंतिम ज्ञान प्राप्त होते, त्याला 'अनुमिती' म्हणतात. हा अनुमानाचा निष्कर्ष असतो.
- व्याप्ती - हेतू (धूर) आणि साध्य (अग्नी) यांच्यातील अविनाभावी आणि कायमस्वरूपी संबंधाला 'व्याप्ती' म्हणतात. "जिथे जिथे धूर आहे, तिथे तिथे अग्नी आहेच," हा नियम म्हणजे व्याप्ती.
- पक्षधर्मता - हेतू (धूर) हा पक्षामध्ये (पर्वतावर) विद्यमान असणे, याला 'पक्षधर्मता' म्हणतात. म्हणजे पर्वतावर धूर प्रत्यक्ष दिसणे.
- परामर्श - व्याप्तीविशिष्ट पक्षधर्मतेचे ज्ञान म्हणजे परामर्श. "व्याप्ती असलेला धूर या पर्वतावर आहे" असा विचार करणे म्हणजेच परामर्श होय.

- **अनुमान निरुक्ति –**
- अनुपूर्वम् हेतु दृष्टा पश्चात मियते इति अनुमानम् |
- अनुमिति करणम् अनुमानम् | - तर्कसंग्रह

- **अनुमान परिभाषा** –
- येन अनुमीयते तद् अनुमानम् | - तर्कभाषा
- अनुमानं खलु तर्को युक्त्यिपेक्षः | यथा अग्नि जरणशक्त्या, बल व्यायाम शक्त्या | - च.वि. 4
- वस्तु यत् परोक्षं पद् अनुप्रत्यक्षात् पश्चाद् यद् मीयते ज्ञायते तद् अनुमानम् | - गंगाधर राय

- **अनुमान प्रमाण लक्षण**
- अनु पश्चात् व्यभिचारि लिंगालिंगी मीयते ज्ञायते येन तदनुमान | - च.सू. 11
- लिंग परामर्शनाऽनुमीयतेऽतो लिंग परामर्थोऽनुमानम् | - तर्कभाषा
- व्याप्तिबलेनार्थ गमकं लिंगम् | - तर्कभाषा
- मितेन लिंगेनार्थस्य पश्चात् मानम् अनुमानम् | - वात्स्यायन
- तल्लिंगि लिंगपूर्वकम् | न्यायवार्तिक

- **अनुमान प्रमाण स्वरूप -** अनुमितिकरणम् अनुमानम् | - तर्कसंग्रह

- **अनुमिति | -** परामर्शजन्य ज्ञानं अनुमितिः | - तर्कसंग्रह

- **परामर्श -** व्याप्तिविशिष्ट पक्षधर्मता ज्ञानं परामर्शः | यथा अग्नि व्याप्य धूमवानयं पर्वत इति ज्ञानं परामर्शः || तद् जन्य पर्वतो अग्निमानं इति ज्ञानं अनुमितिः | - तर्कसंग्रह

- **व्याप्ति**
- हेतुसाध्ययोः अविनाभाव संबंधः व्याप्तिः |
- साहचर्यो नियमो व्याप्तिः | - तर्कदीपिका
- यत्र यत्र धूमः तत्र तत्र अग्निः इति साहचर्य नियमो व्याप्तिः | - तर्कसंग्रह
- उदा. - जिथे जिथे धूम आहे तिथे तिथे अग्नि आहे - व्याप्ति

  अग्नि - व्यापक (अधिक स्थानावर राहणारा) धूम - व्याप्य (अल्प स्थानावर राहणारा)

- **पक्षधर्मता**
- व्याप्तस्य पर्वतादिवृत्तित्वं पक्षधर्मता | - तर्कसंग्रह
  (हेतुचे पक्षामध्ये राहणे अर्थात् पक्षधर्मता)
- उदा. धूम पर्वतावर असणे = पक्षधर्मता

- **इतर**

| | |
|---|---|
| साध्य | - अनुमान द्वारा जे सिद्ध करायचे आहे त्याला साध्य म्हणतात.<br>- उदा. - धूमयुक्त पर्वतावर धूमद्वारे अग्निची उपस्थितिला सिद्ध करणे. यात अग्नि – साध्य. |
| हेतु | - ज्या साधनद्वारा साध्य सिद्ध करायचे असते त्याला हेतु म्हणतात.<br>- उदा. - धूमद्वारे अग्नि सिद्ध करायचे आहे. यात धूम हेतु आहे. |
| दृष्टांत | - व्याप्ति जिथे सिद्ध आहे ते स्थान किंवा एखादे उदाहरण म्हणजे दृष्टान्त |
| सिसाधयिश | - अनुभवाने सिद्ध करण्याची इच्छा |
| पक्ष | - संदिग्ध साध्यवान पक्षः \| यथा धूमवत्वे हेतौपर्वतः \|\| - तर्कसंग्रह<br>- जिथे साध्य संदिग्ध असतो, तो पक्ष.<br>- जिथे साध्य सिद्ध करायचे आहे ते स्थान.<br>- उदा. पर्वतावर धूम दिसत असताना त्या पर्वतावर अग्नि आहे असे अनुमान करतो तेंव्हा तो पर्वत "पक्ष" होतो. |
| सपक्ष | - निश्चितसाध्यवान् सपक्षः \| यथा तत्र एव महानसः \| - तर्कसंग्रह<br>- जिथे साध्य निश्चितरूपाने असतो ते स्थान - सपक्ष<br>- यालाच दृष्टांत म्हणतात.<br>- उदा – महानस म्हणजेच स्वयंपाक घरामध्ये निश्चित रुपाने अग्नि आणि धुर हे पहायला मिळतात. |
| विपक्ष | - निश्चित साध्य अभाववान् विपक्षः \| यथा तत्रैव महाह्रदः \| - तर्कसंग्रह .<br>- जिथे साध्यचा अभाव निश्चितरूपाने असतो त्याला विपक्ष म्हणतात.<br>- व्यतिरेक व्याप्ति जिथे सिद्ध असते ते स्थान - विपक्ष<br>- उदा. - जलाशय |

## *व्याप्तिविमर्श*

- व्याप्ति प्रकार – 2 - अन्वय व्याप्ति व व्यतिरेक व्याप्ति

**1) अन्वयव्याप्ति**
- अन्वयेन निरूपिता व्याप्ति अन्वयव्याप्तिः | - तर्कसंग्रह
- हेतुसाध्ययोः व्याप्तिः अन्वयव्याप्तिः | -तर्कदीपिका
- हेतु व साध्य यांचा सकारात्मक (होकारात्मक) संबंध म्हणजेच अन्वय व्याप्ति.
- जिथे हेतु आहे तिथे साध्य असतोच.
- उदा. जिथे धूम आहे तिथे अग्नि आहे. (हेतुचा उच्चार प्रथम)

**2) व्यतिरेक व्याप्ति**
- व्यतिरेकेण या व्याप्तिः निरुप्यते सा व्यतिरेक व्याप्तिः | - तर्कसंग्रह
- तद् अभावयोः व्याप्तिः व्यतिरेक व्याप्तिः | - तर्कदीपिका
- व्यतिरेक म्हणजे अभाव. साध्यचा अभाव जिथे असतो तिथे हेतुचासुद्धा अभाव असतो.
- साध्य आणि हेतु यांचा नकासत्मक संबंध
- उदा. – जिथे वन्हि नाही तिथे धूम सुध्दा नाही. (साध्यचा उच्चार प्रथम)

- **व्याप्तिग्रह** –
- व्यप्तिचे ज्ञान ज्याने होते त्याला व्याप्तिग्रह म्हणतात.

## *अनुमान प्रकार*

- **चरकोक्त अनुमान प्रकार – 3**
- प्रत्यक्षपूर्वं त्रिविधं त्रिकालं च अनुमीयते | वन्हिर्निगुढो धूमेन मैथुनं गर्भदर्शनात् || - च.सू. 11

1) **वर्तमानकालिन अनुमान** - धूम पाहून गुढरूपी अग्निचे अनुमान करणे.
2) **भूतकालिन अनुमान** - गर्भ दर्शनाने मैथुनचे अनुमान करणे.
3) **भविष्यकालिन अनुमान** – बीज पाहून भविष्यामध्ये उत्पन्न होणारे वृक्षाचे अनुमान करणे.

- **न्याय दर्शनोक्त प्रकार – 3**

1) **पूर्ववत् अनुमान –**

- कारण पाहून भविष्यमध्ये उत्पन्न होणारे कार्याचा अनुमान करणे.
- उदा. - मेघ पाहून येणारी वर्षाचा अनुमान करणे.
- चरकोक्त भविष्यकालिन अनुमान

2) **शेषवत् अनुमान**

- कार्य पाहून कारणाचे अनुमान करणे.
- उदा – नदीच्या पूराला पाहून पूर्वी झालेली वर्षाचा अनुमान करणे.
- चरकोक्त भूतकालिन अनुमान

3) **सामान्यतोदृष्ट अनुमान**

- एक वस्तु पाहून उत्पन्न होणारे तत्समान वस्तुंचे अनुमान करणे.
- उदा. – एका आम्रवृक्षावर आम्र आलेले पाहून इतरही आम्र वृक्षावर आम्र आले असणार याचा अनुमान करणे. किंवा धूम पाहून अग्निचा अनुमान करणे.
- चरकोक्त वर्तमानकालिन अनुमान

- **लिंगपरामर्श - व्याप्ति नुसार - 3 प्रकार -** अन्वयी अनुमान, व्यतिरेकी अनुमान, अन्वय व्यतिरेकी अनुमान
- **व्याख्या –**
    - स्वार्थानुमिति परार्थानुमितित्योलिंगपरामर्श एव करणम् | तस्माद् लिंगपरामर्शो अनुमानम् | - तर्कसंग्रह

(स्वार्थानुमिति आणि परार्थानुमिति दोघांमध्ये सुद्धा लिंगपरामर्श कारण असते. अतः अनुमितिचा कारण असल्याने लिंगपरामर्श हेच अनुमान आहे.)

- **लिंगपरामर्श प्रकार – 3**
    - अन्वय = साहचर्य - तत् सत्वे तत् सत्वं समन्वयः | अर्थात् एक असताना त्याच्या सोबत दूसरा असतोच. त्याला अन्वय म्हणतात. जसे जिथे धूम असतो तिथे अग्निही असतो (स्वयंपाकघर). हे अन्वय असते.
    - व्यतिरेक - (अन्वयच्या विपरीत) - तद् अभावे तद् अभावो व्यतिरेकः | अर्थात् एखादा नसल्यावर दूसराही नसतो. जसे जिथे अग्नि नसतो तिथे धूमही नसतो (जलाशय). हे व्यतिरेक असते.

1) **केवलान्वयि**

- अन्वयमात्रव्याप्तिकम् केवलान्वयि |
- ज्या लिंगसोबत फक्त अन्वय प्राप्ति होते त्याला केवलान्वयि लिङ्ग म्हणतात.
- उदा - यथा घटोऽभिधेयः प्रमेयत्वात् पटवत् | अत्र प्रमेयत्वाभिधेयत्व योर्व्यतिरेकव्याप्तिर्नास्ति, सर्वस्यापि प्रमेयत्वाद अभिधेत्वाच्च | - तर्कसंग्रह

2) **केवलव्यतिरेक**

- व्यतिरेक मात्रव्याप्तिकं केवलव्यतिरिकी | - तर्कसंग्रह
- ज्या लिङ्गसोबत फक्त व्यतिरेक व्याप्ति असते त्याला केवलव्यतिरेकी लिंग म्हणतात.
- उदा.- यथा पृथ्वीतरेभ्योभिद्यते गन्धवत्वात् | यदितरेभ्यो न भिद्यते न तद् गंधवत | यथा जलम् | - तर्कसंग्रह

3) **अन्वयव्यतिरेक**

- अन्वयेन व्यतिरेकेण व्यप्तिमदन्वय व्यतिरेकी | - तर्कसंग्रह
- जिथे अन्वय एवं व्यतिरेक दोन्ही प्रकारांची व्याप्ति होते त्याला अन्वय व्यतिरेकी म्हणतात.

- **तर्कसंग्रहोक्त अनुमान प्रकार - 2**

**1) स्वार्थानुमान -**

- स्वार्थ स्वानुमित्तहेतुः |
- जे अनुमति स्वत:पर्यंतच मर्यादित राहते त्या अनुमितिला स्वार्थानुमिति व तत्कारणीभूत अनुमानला स्वार्थानुमान म्हणतात.
- स्वार्थानुमान क्रम = व्याप्तिग्रह → विशिष्ट स्थानपर साध्य संदेह → हेतुदर्शन → व्याप्तिस्मरण → लिंगपरामर्श → अनुमिति

**2) परार्थानुमान**

- यत्तु स्वयं धूमादिग्निम् अनुमानाय परं प्रति बोधयितुं पंचावयववाक्यं प्रयुज्यते तत्परार्थानुमानम् |
- स्वत:ला समजलेली अनुमिति दूसऱ्या व्यक्तिला सांगुन समजवण्यासाठी ज्या अनुमान पद्धतिचा उपयोग केले जाते त्याला परार्थानुमान म्हणतात.
- यासाठी पंचअवयवांची आवश्यकता असते. यालाच न्यायदर्शनमध्ये 'न्यायव्याक्य' असे म्हणले आहे.

### *पंचावयव वाक्य*

- **तर्कसंग्रह** - पंचावयव वाक्य – 1. प्रतिज्ञा 2. हेतु 3. उदाहरण 4. उपनय 5. निगमन

| पंचावयव | वर्णन |
|---|---|
| प्रतिज्ञा | - साध्यनिर्देश: प्रतिज्ञा \| - न्यायदर्शन (पक्षावर साध्याचे निर्देश करणे यालाच प्रतिज्ञा म्हणतात.)<br>- पर्वतो अग्निमान् इति प्रतिज्ञा \| - तर्कसंग्रह ('पर्वत अग्निमान आहे' हे प्रतिज्ञा आहे.)<br>- साध्याच्या सिद्धिसाठी जो सिद्धांत वाक्य म्हणले जाते ते प्रतिज्ञा आहे. |
| हेतु | - हेतुर्नामोपलब्धि कारणं \| - च.वि.8 (उपलब्धि (ज्ञान) चे साधनभूत कारणाला हेतु म्हणले जाते.)<br>- उदाहरण साधर्म्यात् साध्यसाधनं हेतुः \| - न्यायदर्शन<br>- कोणत्याही कार्याचे कारण अर्थात् हेतु<br>- उदा . धूमवत्वाद् इति हेतुः \| - तर्कसंग्रह (धूम या कारणाने वन्हिची सिद्धि होते, व पर्वत धूमवान् आहे हे हेतु आहे.) |
| उदाहरण | - लौकिकपरीक्षकाणां याग्निन्र्थे बुद्धिसाम्यं स दृष्टान्तः \| - न्यायदर्शन<br>- दृष्टान्तो नाम यत्र मूर्खविदुषां बुद्धिसाम्यं \| - च.वि. 8<br>- ज्या स्थानमध्ये लौकिक (साधारण मानव / मूर्ख) आणि परीक्षक दोघांना विषयाचे ज्ञान समानरुपाने होतो, त्याला दृष्टान्त (उदाहरण) म्हणतात.<br>- उदा.- योयो धूमवान इति उदाहरणम् यथा महानसः \| - तर्कसंग्रह (जे धूमवान् असते ते अग्निमान असते. जसे स्वयंपाकघर) |
| उपनय | - उदाहरणपेक्षस्त थेत्युपनयः \| - न्यायदर्शन<br>- तथा च अयम् इति उपनयः \| - तर्कसंग्रह<br>- उदाहरण अनुसार साध्याचे समर्थन करणे हे उपनय आहे.<br>- उदा. – हे पर्वतसुद्धा (स्वयंपाकघरा समान) वन्हिव्याप्य धूमयुक्त आहे. |
| निगमन | - हेत्वपदेशात् प्रतिज्ञाः पुनर्वचनं निगमनम् \| - न्यायदर्शन<br>- तस्तात्तथेतिनिगमन् \| - तर्कसंग्रह<br>- हेतु प्रदर्शित करुन निष्कर्ष रूपामध्ये आपली प्रतिज्ञा पुन्हा उच्चार करणे हे निगमन असते.<br>- उदा. - अतः पर्वत अग्निमान आहे. |

- **चरकोक्त परार्थानुमान – च.वि 8**

| | | वर्णन | उदाहरण |
|---|---|---|---|
| 1) | प्रतिज्ञा | प्रतिज्ञानम् साध्यवचनम् | पुरुष नित्य आहे |
| 2) | हेतु | हेतुर्नामोपलब्धि कारणम् तत् प्रत्यक्षम् अनुमानम् एतेह्यम्, औपम्यमिति, एभिर्हेतुभिर्य दुपलभ्यते तत् तत्वम् | कारण ते कृत (कोणाद्वारे निर्मित) नाही आहे. |
| 3) | दृष्टान्त | दृष्टान्तो नाम यत्र मूखविदुषां बुद्धिसाम्य यो वर्ण्यं वर्णयति \| | आकाश कृत् नाही आणि ते नित्य आहे. |
| 4) | उपनय | उपनयो चोक्तं **स्थापना** व्याख्यायाम् | आकाश अकृत् आहे जसे पुरुष अकृत् आहे |
| 5) | निगमन | निगमनं चोक्तं **प्रतिष्ठापना** व्याख्यायाम् | अतः पुरुष नित्य आहे. |

- **वात्स्यायनोक्त परार्थानुसार - पंच अवयव**

1. जिज्ञासा 2. संशय 3. शक्यप्राप्ति 4. प्रयोजन 5.संशयव्युदास

*हेतु*

- **व्याख्या**
- साध्यसाधनम् हेतुः |
- पक्षावर साध्य सिद्ध करण्यासाठी दिले गेलेले प्रमाण / कारण म्हणजेच हेतु

- **हेतु प्रकार - 2 -** 1. सदहेतु 2. असद् हेतु (हेत्वाभाव, अहेतु)

**1) सदहेतु –**
- योग्य अनुमानाकडे घेवुन जाणारा हेतु म्हणजे सद्हेतु.
- जो हेतु यथार्थ असतो आणि आभास उत्पन्न करत नाही तो सद्हेतु.
- सद्हेतु प्रकार - **5** (किंवा हेतु गुण 5)

| **सद्हेतु प्रकार** | **वर्णन** | **उदहारण** |
|---|---|---|
| पक्षेसत्वं | हेतु पक्षमध्ये असावा. | पर्वतावर धूम आहे. |
| सपक्षेसत्वं | हेतु सपक्षामध्ये असावा. | स्वयंपाकघरामध्ये धूम आहे. |
| विपक्षे असत्वं | हेतु विपक्षामध्ये नसावा. | जलाशयमध्ये धूम नसतो. |
| अबाधित विषयत्वं | हेतुंनी सिद्ध होणारा अनुमान प्रत्याक्षादी प्रमाणांद्वारा बाधित होवू नये. | पर्वतावर प्रत्यक्ष जावून पाहिले तरीही तिथे अग्नि दिसणार. |
| असत्प्रतिपक्षत्व | हेतु प्रतिपक्षाला असत् ठरवावा. (साध्यच्या विपरीत अर्थाला सिद्ध करणारे हेतुला प्रतिपक्ष म्हणतात.) | |

**2) असदहेतु**
- पर्याय – न्या.द. – असदहेतु
  - त.सं.- दृष्ट हेतु अथवा हेत्वाभास
  - चरक – अहेतु – 3 प्रकार - 1. प्रकरणसम 2. संशयसम 3. वर्ण्यसम

- **हेत्वाभास**
- हेतुवत् आभासन्ते इति हेत्वाभासाः दृष्ट हेतवः | - तर्कसंग्रह
  - जो हेतु नसून सुद्धा हेतु समान प्रतीत होतो तो हेत्वाभास आहे.
  - असत्य अनुमान ज्या हेतुने होतो तो हेत्वाभास अथवा असद् हेतु असतो.
- अनुमितिप्रतिबंधक यथार्थज्ञानविषयत्वम हेत्वाभासत्वम् | - तर्कसंग्रह
  - अनुमितिला प्रतिबंध करणारे यथार्थ ज्ञानाचे विषयाला हेत्वाभास म्हणतात.

- **हेत्वाभास प्रकार - 5 (किंवा हेतु दोष)**
  **1) सव्यभिचार (अनैकान्तिक हेत्वाभास)**
  - सव्यभिचारं नाम यद् व्यभिचरणं यथा भवेदिदमौषधमास्मिन् व्याधौ यौगिकमथवा नेति | - च.वि. 8
  - ज्याचे व्यभिचरण असेल त्याला सव्यभिचार म्हणतात. अर्थात् निश्चित रूपाने एक गोष्ट न सांगता येणे.
  - उदा. – ही औषधि या रोगामध्ये कार्य करणार की नाही करणार?
  - जो आपल्या साध्यसोबत सर्वदा वर्तमान राहत नाही त्या हेतुला सव्यभिचार / अनैकान्तिक हेत्वाभास म्हणतात.
  - **सव्यभिचार / अनैकान्तिक हेत्वाभास प्रकार - 3**

    **A) साधारण अनैकान्तिक**
    - <u>तत्र साध्याभाववद् वृत्तिः</u> साधारणोऽनैकन्तिकः | - तर्कसंग्रह
    - स्थानमध्ये साध्याच्या अभावहेतुचे असणे, हे साधारण सव्यभिचार आहे
    - उदा. – ही गाय आहे कारण याला शींग आहेत. इथे 'शींग' साध्यमध्ये म्हणजे गायमध्ये सुद्धा असते आणि गाय व्यतिरिक्त अन्य पशुमध्ये (साध्याचे अभाव स्थान)मध्येही असते.

**B) असाधारण अनैकान्तिक**

- सर्वसपक्षविपक्षव्यावृत्तः पक्षमात्रवृत्तिरसाधारणः | - तर्कसंग्रह
- जो हेतु फक्त पक्षमध्ये असतो व अन्य सपक्ष, विपक्षमध्ये नसतो, तो असाधारण हेत्वाभास.
- उदा.- शब्द् नित्य आहे, त्यामध्ये फक्त शब्दत्व असते. शब्दत्व शब्द व्यतिरिक्त अन्यत्र कुठेही नसतो.

**C) अनुपसंहारि अनैकान्तिक**

- अन्वयव्यतिरेकदृष्टान्तरहितोऽनुपसंहारी |
- जो हेतु अन्वय, व्यतिरेक आणि दृष्टान्त याव्यतिरिक्त असते त्याला अनुपसंहारी म्हणतात.
- उदा.- प्रमेय (ज्ञान) असल्याने सर्व काही अनित्य आहे.
- यात 'सर्व' हे पक्ष, 'अनित्य' हे साध्य, 'प्रमेय' हे हेतु आहे.

**2) विरुद्ध हेत्वाभास**

- साध्याभावव्याप्तो हेतुर्विरुद्ध | - तर्कसंग्रह
- जो हेतु साध्य सिद्ध करायच्या ऐवजी साध्यचा अभावच सिद्ध करतो तो विरुद्ध हेत्वाभास असतो.
- उदा. - शब्द नित्य आहे कारण ते घटासमान उत्पन्न होतो.
- यात नित्य वस्तुची कधीही उत्पत्ति होत नाही. म्हणून इथे हेतु हा साध्य म्हणजे नित्यत्वाची सिद्धि न करता अनित्याची सिद्धि करतो. म्हणून हा विरुद्ध हेत्वाभास.

**3) सत्प्रतिपक्ष**

- साध्याभावसाधकं हेत्वन्तरं यस्य स सत्प्रतिपक्षः | - तर्कसंग्रह
- एक हेतुने साध्य सिद्ध करतेवेळी त्या पक्षावर साध्यचा अभाव सिद्ध करणारा हेत्वन्तर (दुसरा हेतु) उपस्थित होणे, हा सत्प्रतिपक्ष हेत्वाभास असतो.
- उदा. - यथा शब्दो नित्यः श्रावणत्वाच्छब्दत्ववत् | शब्दोऽनित्यः कार्यत्वाद् घटवत् | (जसा शब्द हा श्रावणत्वामुळे (ऐकू येण्याच्या गुणामुळे) नित्य आहे; तसेच शब्द हा कार्यत्वामुळे (निर्मित असल्यामुळे) घटाप्रमाणे अनित्य आहे.)

**4) असिद्ध हेत्वाभास**

- तत्र लिंगत्वेनासिद्धो हेतुः असिद्धः | - तर्कभाषा
- लिंगत्व रूपाने असिद्ध या अनिश्चित हेतुला असिद्ध हेत्वाभास म्हणतात.
- साध्य सिद्ध करण्यासाठी ज्या हेतुचा उपयोग केला जातो तो स्वत: सिद्ध न झाल्यास त्यातून उत्पन्न दोषाला असिद्ध हेत्वाभास म्हणतात.
- उदा. - छायाला त्याच्या गतिच्या आधारावर द्रव मानणे. पण यात छायाची गति द्रव्याच्या गतिवरच निर्भर असते. म्हणून छायामध्ये गति असणे स्वतः असिद्ध आहे.
- असिद्ध हेत्वाभास प्रकार - 3

**A) आश्रय असिद्ध**

- ज्या हेतुच्या आश्रयाचा (पक्षाचा) अस्तित्वच नसतो त्याला आश्रयासिद्ध म्हणतात.
- उदा. - गगनारविन्दं सरभि अरविन्दत्वात् सरोजाऽरविन्दवत् | - तर्कसंग्रह
- आकाशामधील कमळ हे तलावामधील कमळसारखे सुगन्धित असते.
- पण इथे आकाश (आश्रय) हे अस्तित्वरहित असल्याने तिथे कमळची उत्पत्ति होवुच शकत नाही. हे आश्रयसिद्ध हेत्वाभास आहे. अन्य उदा. – काकदन्त, शशश्रुंग इत्यादी

**B) स्वरुप असिद्ध**

- स्वरूपऽसिद्धो यथा - शब्दों गुणश्चाक्षुषत्वा | - तर्कसंग्रह
- जेंव्हा साध्य हे स्वरूप किंवा स्वगुण नसल्याने सिद्ध होवू शकत नाही तेंव्हा त्याला स्वरूपासिद्ध हेत्वाभास म्हणतात. यात साध्य सिद्धिसाठी हेतुच नसतो.
- उदा. - शब्द् गुण आहे कारण ते डोळ्यांनी पाहता येते.
- इथे शब्द् हे रूपात्मक गुण नसून श्रवणात्मक गुण आहे. म्हणून हे स्वरूपाऽसिद्ध हेत्वाभास आहे.

**C) व्याप्यत्व असिद्ध**

- सोपाधिको हेतुर्व्याप्यत्वाऽसिद्धः | - तर्कसंग्रह .
- उपाधि सहित हेतुला व्यापत्वाऽसिद्ध म्हणतात.
- उपाधि म्हणजे जो साध्य (धूम)चा व्यापक असेल, आणि साधन (अग्नि)चा व्यापक नसेल.

**5) बाधित हेत्वाभास**


- यस्य साध्याभावः प्रमाणान्तरेण निश्चितः. स बाधितः |
- ज्या हेत्वाभासाच्या साध्यचा अभाव अन्य प्रमाणांद्वारे सिद्ध होतो त्याला बाधित हेत्वाभास म्हणतात.
- उदा . – अग्निमध्ये उष्णता नाही कारण ते द्रव्य नाही.
- इथे उष्णता न होणे हे साध्य आहे, पण अग्निची उष्णता प्रत्यक्ष स्पर्शनेन्द्रिय प्रमाणद्वारा सिद्ध होते.

- FlowChart

हेतु

सद्हेतु
- पक्षेसत्वं
- सपक्षेसत्वं
- विपक्षे असत्वं
- अबाधित विषयत्वं
- असत्प्रतिपक्षत्व

असद्हेतु
- चरकनुसार
  - प्रकरणसम
  - संशयसम
  - वर्ण्यसम
- तर्कसंग्रहनुसार
  - सव्यभिचार – साधारण, असाधारण, अनुपसंहारी
  - विरुद्ध
  - सत्प्रतिपक्ष
  - असिद्ध – आश्रय, स्वरूप, व्यापत्व
  - बाधित




**सूत्र स्मरण**

यत्र हेतु दोषयुक्तः स हेत्वाभासः ।
पञ्च प्रकाराः स्मरणीयाः ॥

**पंच्च हेत्वाभास – सारांश (Quick Memory Table)**

| क्रम | हेत्वाभास | इंग्रजी अर्थ | मुख्य लक्षण | स्मरण सूत्र (Memory Hint) | उदाहरण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सव्यभिचार (अनैकातिक) | Uncertain Hetu | हेतु साध्यसोबत निश्चित नाही | Uncertain | गाय = शींग ? , सर्व अनित्य |
| 2 | विरुद्ध | Opposite Proof | हेतु साध्याच्या विरुद्ध सिद्ध करतो | Opposite | शब्द नित्य कारण उत्पन्न होतो |
| 3 | सत्प्रतिपक्ष | Counter Argument | दुसरा हेतु साध्याचा अभाव सिद्ध करतो | Counter | शब्द नित्य (श्रावणत्व), शब्द अनित्य (कार्यत्व) |
| 4 | असिद्ध | Unproved Hetu | हेतुच सिद्ध झालेला नाही | Unproved | छाया द्रव आहे ? , गगनारविंद इ. |
| 5 | बाधित | Defeated by Evidence | इतर प्रमाणांनी साध्यचा अभाव सिद्ध | Defeated | अग्निमध्ये उष्णता नाही – (इंद्रिय प्रमाण) |

**स्मरण मंत्र**

सव्यभिचारो विरुद्धश्च
सत्प्रतिपक्षोऽसिद्धता तथा ।
बाधितः पञ्चमः प्रोक्तः
हेत्वाभासः स्मृतः बुधैः ॥